श्री. सुनिल चंद्रकांत कानडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-याची नेमणुक करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद

सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि१/आस्था२/१६६/७१९६/२०२५

अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

वाचा:- १. इकडील दोषारोप पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-२/३६०/२०२५ दि १८.०८.२०२५

२. कार्यकारी अभियंता,जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.बांध/कार्या-१/आस्था-१/८६८/२०२५ दि.२५.११.२०२५ समवेत श्री.कानडे यांचा खुलासा दि.२३.०९.२०२५

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री. सुनिल चंद्रकांत कानडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, अहिल्यानगर येथे कार्यरत असताना वारंवार कार्यालयीन कामी विना परवानगी गैरहजर राहणे, कार्यालयीन दैनदिन उपस्थितीचे नोदवहीमध्ये स्वाक्षरी करुन कार्यालयात अनुउपस्थित राहणे, कार्यालयीन पर्यवेक्षीय कामकाजात वरिष्ठांचे आदेशाची अवमानता करुन कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा करणे इत्यादी गैरवर्तन केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये श्री कानडे.यांना ज्ञापन दोषारोप बजाविण्यात आले .सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप संदर्भ क्र. २ अन्वये श्री.कानडे यांचा दि.२३.०९.२०२५ रोजी सादर करण्यांत आलेला खुलासा अमान्य केल्याने श्री.कानडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे क्रमप्राप्त असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.महेंद्र किसनराव आंधळे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.१ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी .

परिशिष्ट क्रमांक तीन व चार मध्ये (दोषारोप पत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक .२०२५१२२१६०४०२०९. - . . . . .असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27-12-2025 12:13:18

आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते

२. श्री. महेंद्र किसनराव आंधळे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.
व्दारा व प्रत - उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सामान्य), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री.महेंद्र किसनराव आंधळे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.
सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते

३. श्री. सुनिल चंद्रकांत कानडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, अहिल्यानगर
व्दारा:- कार्यकारी अभियंता, जि प सा.बा.दक्षीण विभाग, अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री. सुनिल चंद्रकांत कानडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.